महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ मंगळवार, २३ फेब्रुवारी २०१६

# 'एमआयटी'चा 'सिस्को'बरोबर करार




'एज्युगिल्ड'तर्फे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवडलेल्या चार कंपन्यांचे प्रतिनिधी

**पुणे :** एज्युगिल्ड या भारतातील पहिल्या एडटेक स्टार्ट-अप ॲक्सिलरेटरला सहकार्य मिळावे, यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने (एमआयटी) सिस्कोबरोबर करार केला आहे. एडटेक (शिक्षण-तंत्रज्ञान) बाजारपेठेतील तंत्रज्ञान आणि व्यवसायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सिस्को आणि एज्युगिल्डने सहकार्य केले आहे.

या उपक्रमांतर्गत एज्युगिल्ड आणि सिस्को एडटेक क्षेत्राबाबत तळमळ असलेल्या प्रशिक्षकांना एकत्र करेल. हे प्रशिक्षक या क्षेत्रातील स्टार्ट-अपना उभारी देण्यासाठी सहकार्य करतील. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ३०० प्रवेशअर्ज अंतिम करण्यात आले होते. त्यातील चांगली क्षमता असलेल्या चार कंपन्यांची 'एज्युगिल्ड'ने प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड केली. या चार नवकंपन्यांमध्ये पुण्यातील क्लासबोट, बेंगळुरू आयटी हब येथील इन्स्टाफीज, दिल्लीतील सिम्प्युलॅनिस आणि मुंबईतील ग्रॅडोपीडिया यांचा समावेश आहे.

'या कंपन्यांना १६ आठवड्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम दिला जाईल. एज्युगिल्ड या कंपन्यांना त्यांच्या भांडवलदारांच्या जाळ्याच्या माध्यमातून निधी उभा करण्यासही मदत करेल. त्याचबरोबर त्यांना उद्योगांतील वरिष्ठ आणि अनुभवी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळेल,' असे एज्युगिल्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी कपाल यांनी सांगितले. स्टार्ट-अप संस्कृती रुजविण्यासाठी एज्युगिल्ड आणि एमआयटी ॲकॅडमी ऑफ इंजिनीअरिंग, पुणेतर्फे आळंदी कॅम्पसवर सेंटर ऑफ आंत्रप्रेन्युअरशिप स्थापन करण्यात येणार आहे.